तपासी अधिकारी

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अहिल्यानगर **P.S.(ठाणे):** तोफखाना
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0654 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**20/06/2025 20:04

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शुक्रवार
**Time Period (कालावधी):** पहर 4
**Date From (दिनांक पासून):** 20/06/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 20/06/2025
**Time From (वेळेपासून):** 09:58 वजे
**Time To (वेळेपर्यंत):** 10:20 वजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 20/06/2025 **Time (वेळ):** 19:00 वजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 043
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 20/06/2025 19:53 वजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 04 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** श्रीराम चैक,पाईपलाईन रोड,सिटी लॉन्स जवळ, नगर-छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर
(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** भाऊसाहेब गंगाधर निमसे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1967

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | राघोहिवरे,पाथर्,तापाथर्डी जिअहिल्यानगर ,तोफखाना,अहिल्यानगर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | राघोहिवरे,पाथर्,तापाथर्डी जिअहिल्यानगर ,तोफखाना,अहिल्यानगर,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9851517676

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुधाकर श्रीरंग मुंढे | | | 1. प्लॉट न 68,69 केशव कुंज, पाईपलाईन रोड, श्रीराम चैक , ऐ,अहिल्यानगर ,तोफखाना, अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद
ला.प्र.वि,अहिल्यानगर

दि.20/06/2025

मी भाऊसाहेब गंगाधर निमसे, वय- 58 वर्षे, धंदा- सेवानिवृत्त ग्रामसेवक, रा. राघोहिवरे, पाथर्डी, ता. पाथर्डी जि. अहिल्यानगर मो.न. 9851517676

मी वरील ठिकाणी कुटुंबासह राहत असुन मी दिनांक 31/05/2025 रोजी ग्रामपंचायत अधिकारी म्हणून टाकळीमियाँ ग्रामपंचायत, पंचायत समिती, राहुरी येथून सेवानिवृत्त झालो आहे. मला टाकळीमियाँग्रामपंचायत हदिदत राहणा-या ग्रामस्थांच्या तक्रारीवरून गटविकास अधिकारी, राहुरी यांनी सादर केलेल्या अहवालावरुन मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद, अहिल्यानगर यांनी दि. 08/05/2025 रोजी कर्तव्यावरून निलंबित केले आहे. तसेच मला निलंबित केल्यानंतर पुढील कार्यवाहीसाठी दोषारोपपत्राचा अंतिम अहवाल मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद, अहिल्यानगर यांना सादर करण्याचे अधिकार गट विकास अधिकारी, राहुरी यांना आहेत. त्यासाठी मी श्री मुंढे, गट विकास अधिकारी, राहुरी यांना पाच-सहा दिवसापुर्वी अहिल्यानगर मध्ये भेटलो होतो. तेव्हा ते मला म्हणाले की, तुमचे दोषारोपपत्र तुमच्या बाजुने पुढे पाठविण्यासाठी तुम्हाला काहीतरी खर्च करावा लागेल. ते असे म्हणाल्यावर माझे लक्षात आले की, श्री मुंढे, गट विकास अधिकारी, राहुरी हे माझ्याकडे लाचेची मागणी करीत आहेत. मला त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्यामुळे मी दिनांक 19/06/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, अहिल्यानगर येथे संपर्क साधला असता माझे बोलणे छाया देवरे मॅडम, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय अहिल्यानगर यांच्या सोबत झाले. मी त्यांना सदर बाबत तक्रार सांगितली व मी आज रोजी श्री मुंढे साहेब, गट विकास अधिकारी यांची पंचायत समिती, राहुरी येथील त्यांच्या कार्यालयात 16.00 वा च्या सुमारास जावून भेट घेणार असल्याबाबत सांगितले. त्यावेळी त्यांनी मला राहुरी येथे सुरक्षित ठिकाणी थांबण्याबाबत सुचना दिल्या.

त्यानुसार दुपारी 14.30 वा चे सुमारास पोलीस निरीक्षक छाया देवरे मॅडम, कर्मचारी व पंच हे राहुरी येथे सुरक्षित ठिकाणी आले. सदर ठिकाणी पोलीस निरीक्षक छाया देवरे मॅडम यांनी माझा परिचय त्यांचे सोबतचे कर्मचारी,दोन शासकीय पंचांसोबत करुन दिला.

त्यानंतर मी वरील आशयाची माझी लेखी तक्रार पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांना दोन पंचासमक्ष तोंडी सांगीतली तसेच स्वहस्ताक्षरात माझी लेखी तक्रार लिहून दिली ती दोन्ही पंचांनी वाचुन पाहिली, त्यावर मी, दोन पंचांनी व पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी सहया केल्या. त्यांनतर माझ्या तक्रारीवरुन श्री मुंढे साहेब, गट विकास अधिकारी यांची पंचायत समिती, राहुरी हे माझ्या कामासाठी माझ्याकडे लाच मागणी करतात अगर कसे? याबाबत पडताळणी करण्याचे ठरले. पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी सदर पडताळणी कारवाईमध्ये व्हॉईस रेकॉर्डर वापरण्यात येणार असल्याचे सांगुन त्याबाबत मला, व पंचांना माहिती दिली, तसेच पडताळणी कारवाई बाबत सुचना दिल्या.त्यानंतर पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन व्हॉईस रेकार्डर चालु करुन माझे, दोन्ही पंचांचे तसेच पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांचे उपस्थिती बाबत निवेदन रेकॉर्ड करण्यात आले. त्यानंतर पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्या ताब्यात दिले व श्री मुंढे साहेब, यांची भेट घेण्यासाठी मला, पंच क्र.1 यांना माझ्या कडील चारचाकी वाहनाने रवाना केले.

त्यानुसार आंम्ही पंचायत समिती, राहुरी येथील श्री मुंढे साहेब, गट विकास अधिकारी यांचे कार्यालयात गेलो असता त्याठिकाणी श्री मुंढे साहेब हजर नव्हते त्यामुळे तेथे चैकशी केली असता साहेब बाहेर गेले असून थोडया वेळात परत येतील अशी माहिती मिळाली. त्यानंतर मी व पंच क्र 1 असे सुरक्षित ठिकाणी परत आलो तेव्हा पोनि

देवरे मॅडम यांनी व्हॉईस रेकॉर्डर बंद केला तेव्हा मी त्यांना वरील प्रमाणे हकिगत सांगितली . त्यानंतर काही वेळाने 16/07 वा पोनि देवरे मॅडम यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालू करून माझे ताब्यात दिले. त्यानंतर मी व पंच क्र 1 असे माझे चारचाकी वाहनाने पुन्हा पंचायत समिती कार्यालय, राहुरी येथे गेलो. तेथे मी व पंच क्र 1 असे श्री मुंढे साहेब यांचे कार्यालयात गेलो. तेव्हा मी श्री मुंढे साहेब यांचेकडे माझ्या प्रलंबित कामासंदर्भाने चर्चा केली असता त्यांनी मला उदया सकाळी 9, 10 नंतर फोन करा आपण अहिल्यानगरला भेटू असे सांगितले. त्यानंतर मी व पंच क्र 1 असे सुरक्षित ठिकाणी परत आलो. पोनि देवरे यांना घडलेली हकिगत सांगितली. त्यानंतर सर्वानुमते आज रोजीची कारवाई तात्पुरती स्थगित करण्यात येवून उर्वरीत सापळा कारवाई दि. 20/06/25 रोजी सकाळी 09.00 वा अहिल्यानगर येथे करण्याचे ठरले.

त्यानुसार आज दि.20/06/2025 रोजी सकाळी 09.00 वा चे सुमारास आयोजित लाच मागणी पडताळणी दरम्यान मी व पंच क्र 1 असे पंचाकडील मोटारसायकलने श्रीराम चैकाजवळ , पाईपलाईन रोड, अहिल्यानगर येथे श्री मुंढे साहेब यांची समक्ष भेट घेतली असता "तुम्ही जे काही आणले आहेत ते मनानं दया " असे म्हणून लाच मागणी केली. तेव्हा मी त्यांना दहा देवू का? असे विचारले असता तुम्ही घरातलेच आहेत काय दयायचे ते दया, लवकर या घेवून पाच मिनीटात असे सांगितले. तेव्हा मी श्री मुंढे साहेब यांना बर ठिक हे चालेल मी एटीएम वरून आणतो असे सांगून त्यांचेकडे पैसे आणण्यासाठी वेळ मागुन मी व पंच क्र. 1 असे पंचाकडील मोटारसायकलने सापळा पथक थाबले त्या ठिकाणी परत आलो.

सदर बाबत मी व पंच क्र.1 अशांनी पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांना माहिती दिली, तसेच पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी पंचांसमक्ष व्हॉईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले.त्यावरुन श्री मुंढे साहेब यांनी माझ्याकडे माझ्या निलंबनाच्या दोषरोपपत्र अहवाल माझे बाजुने मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद, अहिल्यानगर यांना पाठविण्यासाठी लाच मागणी करून लाचेची रक्कम स्वीकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर श्री मुंढे साहेब, गट विकास अधिकारी,पंचायत समिती, राहुरी, यांचे विरुध्द लाचेचा सापळा आयोजीत करण्याचे ठरले. त्यानंतर पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी सापळा कारवाईमध्ये अँन्थ्रासीन पावडर व अल्ट्राव्हायलेट दिवा वापरण्यात येणार असुन त्याबाबत पोना काळे यांनी मला व पंचांना उजेडात व अंधारात प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्यानंतर पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांचे सुचनेवरुन श्री मुंढे साहेब यांनी 10,000/- रुपये स्विकारण्याचे मान्य केल्याने ती लाच रक्कम मी माझ्या बचतीतुन हजर केली. त्यात 500 रुपये दराच्या 20 भारतीय चलनी नोटा मी हजर केल्या, त्यानंतर सदर नोटांचे नंबर लिहुन घेण्यात आले व सदर नोटांवर अँन्थ्रासीन पावडर लावण्यात आली व सदर लाच रक्कम माझ्या शर्टच्या डाव्या बाजुच्या खिशात ठेवली त्यानंतर मला व पंचांना सापळा कारवाई बाबत पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्याकडे दिला त्यानंतर मला व पंच क्र. 1 यांना श्री मुंढे साहेब यांची भेट घेवुन 10,000/- रुपये लाच रक्कम देण्यासाठी पंचाकडील मोटरसायकलने रवाना केले. आमचे मागोमाग सापळा पथक आले. मी व पंच क्र 1 श्रीराम चैक, पाईपलाईन रोड, अहिल्यानगर येथे जात असताना मला श्री मुंढे साहेब यांचा फोन आला व त्यांनी मला लाच रक्कम घेवून औरंगाबाद हायवे वर सिटी लॉनजवळ येण्यास सांगितले.

मी व पंच क्र. 1 असे सोबतच श्री मुंढे साहेब यांच्या जवळ गेलो. त्यावेळी मी श्री मुंढे साहेब यांचेकडे पाहुन लाचेची रक्कम त्यांचे समोर धरून हे दहा हजार हेत असे म्हटले तेव्हा श्री मुंढे साहेब हे मला म्हणले की, 10 हजार पाच हजार घ्यायला मला वाईट वाटतय असे म्हणून त्यांनी माझ्याकडुन 10,000/-रूपये लाचेची रक्कम स्वीकारून त्यांच्या नेसत्या पॅन्टच्या उजव्या खिशामध्ये ठेवली. त्यानंतर मी मला ठरवुन दिलेला लाच रक्कम स्वीकारले बाबतचा डावा हात डोक्यावरुन फिरविण्याचा नियोजीत इशारा सापळा पथकास केला असता बाजुला आडोशाला उभे असलेले पोलीस निरीक्षक देवरे मॅडम व सापळा पथक सदर ठिकाणी आले व श्री मुंढे साहेब यांना लाच रकमेसह रंगेहाथ पकडले. पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी माझ्याकडुन व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन तो बंद केला. त्यावेळी पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी लोकसेवक श्री मुंढे साहेब यांना त्यांचे पुर्ण नाव, पद व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव सुधाकर श्रीरंग मुंढे, वय-57 वर्षे, पद-गट विकास अधिकारी, वर्ग-1, नेमणुक- पंचायत समिती राहुरी, रा. प्लॉट नं. 68,69 केशव कुंज, पाईपलाईन रोड, श्रीराम चैक , ऐश्वर्या नगरी, अहिल्यानगर असे सांगितले..

त्यानंतर लोकसेवक श्री सुधाकर श्रीरंग मुंढे, यांचे ताब्यातुन हस्तगत करण्यात आलेली लाच रक्कम सापळा कारवाई पुर्वी लिहुन घेण्यात आलेल्या नोटांच्या नंबरशी पडताळुन पाहीले असता ते तंतोतंत जुळल्याची खात्री झाल त्यानंतर पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी लोकसेवक सुधाकर मुंढे, यांना सोबत घेवुन पुढील कामाकाज कामी ते लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, अहिल्यानगर येथे आले. त्यांचे सुचनेप्रमाणे मी देखील तेथे हजर झालो. पोलीस निरीक्षक देवरे मॅडम व सापळा पथक यांनी त्यांचे त्या ठिकाणी पुढील कामकाज केले.

तरी दिनांक 20/06/2025 रोजी 09.58 वा ते 10.05 वा. दरम्यान श्रीराम चैक,पाईपलाईन रोड, अहिल्यानगर येथे लाच मागणी पडताळणीच्या वेळी व दि.20/06/2025 रोजी 10.15 ते 10.20 वा.दरम्यान सिटी लॉन्स जवळ, नगर-छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर येथे सापळा कारवाईच्या वेळी सुधाकर श्रीरंग मुंढे, वय- 57 वर्षे, पद-गट विकास अधिकारी, वर्ग-1, नेमणुक- पंचायत समिती राहुरी यांनी माझ्या निलंबनाच्या दोषारोपपत्राचा अहवाल मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद, अहिलयानगर यांना माझे बाजूने पाठविण्यासाठी लाचेची मागणी करून 10000/- रूपये लाचेची रक्कम स्विकारली म्हणुन माझी श्री सुधाकर श्रीरंग मुंढे, वय-57 वर्षे, पद-गट विकास अधिकारी, वर्ग-1, नेमणुक- पंचायत समिती राहुरी, रा. प्लॉट नं. 68,69 केशव कुंज, पाईपलाईन रोड, श्रीराम चैक , ऐश्वर्या नगरी, अहिल्यानगर यांचे विरुध्द फिर्याद आहे.

समक्ष

हे लिहुन दिले.

दाखल अंमलदार-पोहेकॉ/गोसावी
तपासी अंमलदार -पोलीस निरीक्षक छाया देवरे नेम-लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अहिल्यानगर

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

AANAND ASHOK KOKARE(I (Inspector)) / DGPAAKM8102 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 Signature/Thumb impression of the complainant / informant.
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. Date and time of dispatch to the court
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अमलदार
तोफखाना पो. स्टे., अहिल्यानगर

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): AANAND ASHOK KOI
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): DGPAAKM8102